# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/११/२०२२ (शुक्रवार) सायंकाळ

---

## दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील तपनी येथे दिनांक २४/११/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– बालक अजाब गजभिये, वय ५० वर्ष, रा. तपनी, ता. काटोल व आरोपी नामे– सुभाष मोतीराम गजभिये, रा. तपनी, तह. काटोल हे नातेवाईक असुन त्यांच्या दोन्ही घराच्या मधातुन सामट गेलेली आहे. नमुद घटना वेळी व ठिकाणी आरोपी याने फिर्यादीला म्हटले की, ‘‘तु या सामटीतुन जाणे येणे करायचे नाही ती जागा माझीच आहे’’ या कारणावरून आरोपीने घरातुन लाकडी काठी आणुन फिर्यादीच्या उजव्या हाताच्या अंगठयाला मारून तसेच डाव्या डोळयाचे वर मारून जखमी केले व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास अधिकारी पोलीस नाईक ब. नं. ६१९ अविनाश बाहेकर मो.नं. ८३०८४०५३७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर